# मुंबई विद्यापीठ

# निवडणूक अधिसूचना

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३२(३)(छ) [32(3)(g)] नुसार अध्यापक आणि विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून (महाविद्यालयीन, परिसंस्थेतील अध्यापक व विद्यापीठातील अध्यापक) प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन (०२) अध्यापकांची विद्यापरिषदेवरील निवडणूक**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम ३२(३)(छ) [32(3)(g)] मधील तरतूदीनुसार अध्यापक व विद्यापीठ अध्यापक गटाने त्यांच्यामधून (महाविद्यालयीन, परिसंस्थेतील अध्यापक व विद्यापीठातील अध्यापक) प्रत्येक विद्याशाखेचे प्रतिनिधीत्व करणारे दोन (०२) अध्यापकांना विद्यापरिषदेवर सदस्य म्हणून निवडून देण्यासाठी दि. १७ मे, २०१७ रोजी महाराष्ट्र शासनाने राजपत्राद्वारे प्रसिध्द केलेल्या सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक ०१ मधील मुद्दा क्रमांक ०९ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

१) मा. कुलगुरू यांच्याकडे अपिल केल्यानंतर अंतिम मतदार यादी दि. २० मे, २०२३ रोजी परिपत्रक क्र.नि.वि./आय.सी.डी./२०२३—२४/३९ दि. १९ मे, २०२३ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे.

२) एकरुप परिनियम क्र. १ मधील ९(१) आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६२ नुसार कुलगुरूंनी वरील मतदार संघासाठी दि. **०५ जुलै, २०२३** ही निवडणुकीची तारीख निश्चित केली आहे.

३) मतदार यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

४) निवडणूकीसाठीच्या जागा : प्रत्येक विद्याशाखेच्या दोन (०२) अशा एकूण आठ (०८) जागा पैंकी ४ खुला प्रवर्गासाठी असून ४ जागा खालीलप्रमाणे राखीव प्रवर्गासाठी आरक्षित आहेत :—

**विद्याशाखेतील जागांचा तपशील खालीलप्रमाणे आहे ——**

| | | | |
|---|---|---|---|
| **अ)** | **विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा (Faculty of Science and Technology)** | खुला (Unreserved) — ०१ जागा | अनुसुचित जाती (SC) — **०१ जागा** |
| **ब)** | **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा (Faculty of Commerce and Management)** | खुला (Unreserved) — ०१ जागा | इतर मागासवर्ग (OBC) — **०१ जागा** |
| **क)** | **मानवविज्ञान विद्याशाखा (Faculty of Humanities)** | खुला (Unreserved) — ०१ जागा | अनुसुचित जमाती (ST) — **०१ जागा** |
| **ड)** | **आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा (Faculty of Inter-Diciplinary)** | महिला (Woman) — ०१ जागा | विमुक्त जाती/भटक्या जमाती (DT/NT) — **०१ जागा** |

**५) सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ. क्र. | तपशील | वार, दिनांक व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(२)(ख) नूसार निवडणुकीच्या दिनांकाच्या पूर्ण १६ दिवस अगोदर) | बुधवार, दि. ०७ जून, २०२३ (वेळ: सायकांळी ५.०० वाजेपर्यंत) | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Login/Registration या Option वर नामनिर्देशन अर्ज भरता येईल. (परिशिष्ठ 'अ' प्रमाणे) |
| २ | उमेदवारी अर्ज छाननीचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १(१०)(६) प्रमाणे) | सोमवार दि. १२ जून, २०२३ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | फिरोजशाह मेहता सभागृह (व्यवस्थापन परिषदेचे दालन), मुंबई विद्यापीठ, कक्ष क्र. १०५, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२. |
| ३ | उमेदवारी अर्जाच्या वैधतेबाबत कुलगुरूंकडे अपील करण्याचा दिनांक | बुधवार, दि. १४ जून, २०२३ (वेळ : सायकांळी ५.०० वाजेपर्यंत) | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर Login/Registration या Option वर अपिल करता येतील. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | उमेदवारी अर्ज मागे घेण्यासंबधी लेखी कळविण्याचा दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्रमांक १(१०)(५) नुसार) | शनिवार, दि. १७ जून, २०२३ (वेळ : सायकांळी ५.०० वाजेपर्यंत) | रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट–४०० ०३२ |
| ५ | उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | सोमवार, दि. १९ जून, २०२३ | विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. |
| ६ | निवडणूक दिनांक, वार व वेळ (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र.९ नुसार) | बुधवार, दि. ५ जुलै, २०२३ (वेळ : सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत) | उमेदवारांची नावे जाहीर करतेवेळी मतदान केंद्रांची नावे ही विद्यापीठाच्या अधिकृत https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येतील. |
| ७ | मतपत्रिकांची छानणी व मतमोजणीचा दिनांक, वार, वेळ व स्थळ | शुक्रवार, दि. ७ जुलै, २०२३ (वेळ : सकाळी ११.०० वाजता) | दिक्षांत सभागृह, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ४०० ०३२. |

६) **उमेदवारी नामनिर्देशन अर्जाच्या वैधतेच्यासंदर्भात कोणताही वाद किंवा शंका असल्यास मा.कुलगुरू यांच्याकडे अपील करण्याचा दिनांक १४ जून, २०२३ व वेळ सायं. ५.०० वाजेपर्यंत.**

७) **शासन आदेश क्र. संकीर्ण–२०१६/(३४७/१६)/विशि.३, दि. २८ एप्रिल, २०१७ अन्वये उमेदवारांसाठी आवश्यक पात्रता:**

**क) उमेदवार हा पीएच.डी पदवीधारक असावा,**
**ख) उमेदवारास एकूण किमान पंधरा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असावा.**
**ग) उमेदवार मान्यताप्राप्त पीएच.डी मार्गदर्शक असेल ज्याच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली असावी,**
**घ) उमेदवार किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असावा किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केलेले असावेत,**
**ङ) उमेदवाराने विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.**

८) विहित नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावरून भरता येतील.

९) योग्यरितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी सर्व कागदपत्रांसह दाखल केलेले, उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील.

१०) नामनिर्देशनपत्रांवर, मत देण्यासाठी हक्कदार असलेल्या दोन मतदारांकडून दिनांक लिहून स्वाक्षरी करण्यात येईल आणि त्यामध्ये, दिनांक, नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची पूर्ण नावे, पत्ते व पदनामे, कोणतीही असल्यास, आणि स्वाक्षरीकर्ता मतदारांचा व नामनिर्देशित उमेदवारांचा मतदार क्रमांक यांचा समावेश असेल, कोणत्याही व्यक्तीला, त्याने नामनिर्देशित पत्रावर स्वाक्षरी करुन व दिनांक लिहून त्याची संमती दिल्याखेरीज निवडणूकीतील उमेदवार म्हणून नामनिर्देशित केले जाणार नाही. कोणतीही व्यक्ती, त्याच्या स्वत:च्या नामनिर्देशनामध्ये एकतर सूचक किंवा अनुमोदक असणार नाही. परंतु जेथे तीनपेक्षा कमी मतदार असतील तेथे उमेदवार, त्याच्या नामनिर्देशनामध्ये स्वत: सूचक व अनुमोदक असू शकेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(३))

११) या निवडणूक सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व अटींचे अनुपालन करीत नसलेले नामनिर्देशनपत्र अवैध असेल आणि ते फेटाळले जाईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(४))

१२) उमेदवारास निवडणुकीतून माघार घेण्याचा पर्याय खुला असेल : परंतु, अशा उमेदवारास निवडणुकीच्या वेळापत्रकात विहित केलेल्या दिनांकास सायंकाळी ५ वाजण्यापूर्वी रुम नं. ११०, निवडणूक विभाग, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट – ४०००३२ येथे व्यक्तिश: किंवा त्याने लिखित स्वरुपात प्राधिकृत केलेल्या व्यक्तीमार्फत त्याने स्वाक्षरीत केलेला नामनिर्देशन मागे घेतल्याचा अर्ज सादर करावा लागेल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(५)) (विहित नमुन्यातील)

१३) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार नसतील तर ते सर्व उमेदवार, निवडणूकीचा निकाल जाहिर करण्याच्या दिनांकास बिनविरोध निवडून आल्याचे जाहिर करण्यात येईल. (एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. (१०)(८))

१४) उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील तर अशा उमेदवारांची अंतिम यादी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

१५) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक २८ एप्रिल,२०१७ व त्या संदर्भात शासनाने वेळोवेळी केलेली परिपत्रके/पत्र यांच्या अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमदवारांचे नामनिर्देशन अर्ज ग्राहय धरण्यात येतील. शासन राजपत्र, शासनाने यासंबंधी वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके/पत्रे तसेच पात्रता शर्तीच्या ग्राहयतेसंबंधीच्या नियमांबाबतची प्रत विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१६) उमेदवारी अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या स्वयं—साक्षांकीत प्रती जोडणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रांच्या प्रमाणीत सत्यप्रती जोडाव्यात (स्वत: प्रमाणीत करावे अथवा प्राचार्य/कुलसचिव/विभागप्रमुख/राजपत्रित अधिकारी/ विशेष कार्य अधिकारी यांनी प्रमाणीत कराव्यात/अधिलेख—खाडाखोड करु नये). छाननीच्या वेळी मूळ प्रमाणपत्र/कागदपत्र सादर करावीत. (मतदार नोंदणीच्या वेळी जोडलेली कागदपत्रे उमेदवारी अर्जाकरीता ग्राह्य धरली जाणार नाहीत.)

**१. पी.एच.डी. पदवी प्रमाणपत्र,**
**२. विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत/प्रती**
**३. एकूण किमान पंधरा (१५) वर्षांचा अध्यापनाच्या अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र.**
**४. उमेदवारास विद्यापीठाने निर्गमित केलेले व ज्याचा वैधता कालावधी समाप्त झालेला नाही असे पीएच.डी मार्गदर्शक म्हणून मान्यता पत्र.**
**५. उमेदवाराच्या पर्यवेक्षणाखाली किमान दोन विद्यार्थ्यांना पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आल्याचा पुरावा म्हणून संबंधीत विद्यार्थ्यांची पदवीप्रमाणपत्रे व निकाल घोषणा पत्रे.** (Declaration of Result of Ph.D.).
**६. उमेदवार हा किमान दोन पाठ्यपुस्तकांचा/संदर्भ पुस्तकांचा लेखक/सहलेखक असल्यास संबंधित पाठयपुस्तक/संदर्भ पुस्तकाची तसा स्पष्ट उल्लेख असलेली पाने/तत्सम कागदपत्रे किंवा मूळ लेखक/अनुरूप लेखक म्हणून तज्ज्ञ परीक्षित जर्नल्समध्ये किमान तीन शोधनिबंध प्रसिध्द केल्या बाबतचा पुरावा म्हणून संबंधीत शोध निबंधाच्या व असे शोधनिबंध ज्या परीक्षित जर्नल्स मध्ये सिध्द झाले आहेत त्याची मुखपृष्ठे व अनुक्रमाणिका यांची पाने (ही परीक्षित जर्नल्स विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिकृत संकेत स्थळावरील परीक्षित जर्नल्सच्या यादीतील असणे आवश्यक आहे.)**
**७. विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाजाचे एकूण किमान पाच वर्षे अनुभवाचे विहित नमून्यातील प्रमाणपत्र,**
**८. नावात बदल असल्यास शासन राजपत्र किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्र.**
**९. जातीचे प्रमाणपत्र.**
**१०. जात वैधता प्रमाणपत्र.**

१७) उमेदवारी अर्ज छाननीसाठी आणि मतमोजणीच्यावेळी उमेदवार स्वत: / सूचक / अनुमोदक किंवा प्रतिनिधी यांपैकी कोणीही एक, कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी लेखी पत्राद्वारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील मतदार असलेली व्यक्ति म्हणून एक तास अगोदर पूर्वसूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहू शकेल.

१८) अंतिम मतदार यादीमध्ये नमूद केलेल्या मतदान केंद्रावरच मतदान करावयाचे आहे. मतदान केंद्र कोणत्याही परिस्थितीत बदलून देण्यात येणार नाही. परंतू एकरुप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. १३ नुसार निवडणुकीच्या कामावर असणाऱ्या व्यक्तींना, ते ज्या ठिकाणी निवडणुकीच्या कामावर आहेत अशा ठिकाणी आपले मत नोंदविण्याची मुभा असेल.

१९) मतदानास येताना मतदारांनी स्वत:चा फोटो असलेले ओळखपत्र उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्यांनी दिलेले फोटोसहीत ओळखपत्र किंवा आयकर अधिका—यांनी (Income Tax) दिलेले फोटोसहीत ओळखपत्र (PAN Card) किंवा तत्सम फोटोसहीत ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका—यांना हे ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

२०) ही निवडणूक प्रमाणशीर प्रतिनिधित्व पध्दतीनुसार एकक संक्रमणीय मतनुसार परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे घेण्यात येईल. या निवडणुकीसाठी मतदान हे पसंतीनुसार प्राधन्यक्रम या पध्दतीने करावयाचे आहे. (एकरूप परिनियम क्र. १ मधील मुद्दा क्र. ५ व ६)

२१) मतदान केंद्रांची यादी दि. १९ जुन, २०२३ रोजी विद्यापीठाच्या https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

२२) एकरुप परिनियम क्र. १ मधील ९(१) नुसार नामनिर्देशन अर्ज भरतांना रु. ५००/— शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे.

स्वाक्षरीत
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/५०
दिनांक : २९ मे, २०२३

**Note : *Under Section 2(18), “Collegium of Teachers” means an electoral college consisting of fulltime approved teachers from affiliated and autonomous colleges and recognized institutions, who shall elect from amongst themselves as members to the different authorities;**

***Under Section 2(19), "Collegium of University Teachers" means an electoral college consisting of fulltime teachers from University Departments, University Institutions, and Conducted Colleges appointed by university who shall elect from amongst themselves as members to the different authorities;**

# <u>परिशीष्ट "अ"</u>

## <u>ऑनलाईन नामनिर्देशन अर्ज भरण्याच्या मार्गदर्शक सुचना.</u>

१) मुंबई विद्यापीठाच्या निवडणूक Portal वर जाण्याकरीता https://mu.ac.in च्या Election 2022 किंवा https://mu.eduapp.co.in या संकेतस्थळाचा वापर करावा.

२) निवडणूकीच्या Portal वर गेल्यानंतर तेथील Login/Registration या Tab ला Click करावे.

३) ज्या मतदार संघांमध्ये (Constituency) नामनिर्देशन अर्ज भरायचा आहे ते मतदारसंघ निवडावा.

४) विद्यापरिषदेसाठी (Academic Council) नामनिर्देशन अर्ज भरण्याकरीता Login for Academic Council या Tab वर Click करावे.

५) आपला मतदार नोंदणीकरीता अर्ज भरताना जो username व password वापरला असेल त्यांनीच Login करावे.

६) आपण Login केल्यानंतर मतदार नोंदणी अर्जामध्ये भरलेली माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

७) आपला मतदार यादी (Electoral Roll) मधील अनुक्रमांक आपोआप (automatically) येईल. जर तो चुकीचा असल्यास आपण तिथे मतदार यादी (Electoral Roll) मधील अचुक अनुक्रमांक नोंदवावा.

८) संबंधीत जागेवर स्वत:चा प्रवर्ग (category) व नामनिर्देशन अर्ज करण्याचा प्रवर्ग निवडावा.

९) संबंधीत जागेवर शैक्षणिक **अर्हता** (Educational Qualification) व अध्यापनाचा अनुभव (Teaching experience) आपोआप (automatically) येईल. जर त्यामध्ये काही दुरूस्ती किंवा अतिरिक्त शैक्षणिक अर्हता/अध्यापन अनुभव अधिकचा द्यावयाचा असल्यास तेथे तो add करावा.

१०) संबंधीत उमेदवारांनी ज्या मतदार संघांमध्ये (Constituency) नामनिर्देशन अर्ज भरायचा आहे त्या नामनिर्देशन अर्जाकरीता असणाऱ्या अर्हतेबाबतचे कागदपत्रे संबंधीत जागेवर अपलोड करावीत.

११) या नंतर सुचक या मतदाराचा username तेथे टाईप करावा.

१२) त्यानंतर सुचकाचा OTP टाकावा.

१३) त्यानंतर सुचकाची माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

१४) सुचकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक संबंधीत जागेवर आपोआप (automatically) दिसेल. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास तर ती अचुक नोंदवावी.

१५) अनुमोदकाचा username टाईप करावा.

१६) त्यानंतर अनुमोदकाचा OTP टाकावा.

१७) अनुमोदकाची माहिती तेथे आपोआप (automatically) येईल.

१८) अनुमोदकाचा मतदार यादीतील अनुक्रमांक संबंधीत जागेवर आपोआप (automatically) दिसेल. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास तर ती अचुक नोंदवावी.

१९) **तद्नंतर उमेदवारी अर्ज मुद्रण पुर्वावलोकन (Print preview) मध्ये उपलब्ध होईल. तो तपासुन घ्यावा. जर त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास Previous या Tab वर Click करून संबंधीत जागेवर जाऊन दुरूस्ती करावी. नंतर आपला अर्ज अचुक आहे. याची खात्री करावी. <u>Print preview अर्जाची Print काढून Submit करू नये ती छाननीकरीता ग्राहय धरली जाणार नाही. याची संबंधीतानी नोंद घ्यावी.</u>**

२०) **अर्ज अचुक असल्याची खात्री झाल्यानंतर Submit या Tab वर Click करावे. Submit हे Tab Click केल्यानंतर अर्जामध्ये कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

२१) तद्नंतर अर्जाचे रू. ५००/- शुल्क Online पध्दतीने भरावे. शुल्क भरल्यानंतर अर्जाची प्रींट आऊट काढावी.

२२) प्रींट काढलेल्या अर्जावर उमेदवार, सुचक व अनुमोदक यांनी दिनांक नोंदवून स्वाक्षरी करावी.

२३) स्वाक्षरी झाल्यानंतर सदर अर्ज स्कॅन करून अपलोड करावा.

२४) उपरोक्त अर्जाच्या हार्ड कॉपी सोबत आवश्यक कागदपत्रे जोडावी. कागदपत्रे जोडलेला अर्ज निवडणूक विभाग, रुम नं. ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट-४०० ०३२ येथे अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाच्या वेळेच्या आधी जमा करावा. कोणत्याही कारणास्तव सदर अर्ज अंतिम दिनांकाच्या वेळेच्या आधी दिलेल्या पत्त्यावर प्राप्त झाला नसल्यास तसेच Print Preview मध्ये सादर केलेला असल्यास तो नामनिर्देशन अर्ज छानणीकरीता ग्राहय धरण्यात येणार नाही, याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत
(प्रा. सुनिल भिरुड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/५०
दिनांक : २९ मे, २०२३